# प्रकरण ५ वे

# उपसंहार

# प्रकरण ५ वे

# 'उपसंहार'

'गंगाधर पानतावणे यांच्या स्तंभलेखनाचा अभ्यास' ('अर्थ आणि अन्वयार्थ' च्या अनुषंगाने) या अभ्यासविषयाची निवड झाल्यानंतर त्या अभ्यासाची रूपरेषा ठरवून घेतली. स्तंभलेखनातून निर्माण झालेल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाच्या दृष्टीने अभ्यास विषयाला अनुसरून चार प्रकरणामध्ये मांडणी केली. प्रत्येक प्रकरण लिहित असताना त्या त्या प्रकरणातील हाती आलेले निष्कर्ष एकत्र विचारात घेऊन प्रस्तुत अभ्यास विषयाची मांडणी या शेवटच्या 'उपसंहार' प्रकरणात केली जाणार आहे.

'स्तंभलेखन : प्रेरणा, स्वरूप व व्याप्ती' हे पहिले प्रकरण मांडत असताना स्तंभलेखन हे वैशिष्ट्यपूर्ण वृत्तपत्रीय लेखन असून त्याच्यातील वाङ्मयीन गुणांमुळे ते वाचकप्रिय ठरते हे लक्षात आले. विविध साहित्यांच्या व माध्यमांच्या जमान्यात आजही वृत्तपत्रांचा खप वाढतो आहे. यामध्ये स्तंभलेखनाचाही वाटा आहे. अनेक वृत्तपत्र वाचणारे लोक स्तंभलेख आवर्जुन वाचतात. अमेरिकेमध्ये १८९० मध्ये शिकागो डेली या वृत्तपत्रातून 'शार्प्स ॲण्ड प्लॅटस्' या नावाखाली 'युजीन फिल्डने' 'स्तंभलेखन' हा लेखन प्रकार प्रसिद्धीस आणला. मराठीमध्ये 'स्तंभलेखन' ही संज्ञा जरी अलिकडच्या काळात वापरात आली असली तरी मराठी वृत्तपत्रामध्ये निबंध, वैचारिक निबंध, लघुनिबंध, ललित निबंध, आत्मपर निबंध या या स्वरूपात नियमित स्वरूपात झालेले लेखनच 'स्तंभलेखन' आहे. मराठी स्तंभलेखनाला जवळपास दीडशे वर्षांची परंपरा आहे.

बऱ्याचवेळा 'सदर लेखना' खाली 'स्तंभलेखन' केले गेले आहे. परंतु स्तंभलेखन आणि सदर लेखन यामध्ये फरक आहे. सदर लेखन हे अनेक लेखकांनी लिहिलेले असू शकते किंवा एकच सदर दोन वेगवेगळे लेखक लिहू शकतात. मात्र स्तंभलेखन हे नियमित, एकाच लेखकाने लिहिलेले असते. तसेच संपादकीय आणि स्तंभलेखन या दोन्हींमध्ये बऱ्याच वेळा तत्कालीन घटनांवर टिप्पणी केलेली असते. मूलभूत फरक असतो. इतर सर्व वृत्तपत्रीय लेखन प्रकार किंवा वाङ्मयीन लेखन प्रकार यापेक्षा स्तंभलेखन वेगळे ठरते. ते त्यांच्या काही वैशिष्ट्यपूर्ण लेखनातील व ते प्रसिद्ध होण्यातील नियमितपणा, विषयांची वैविध्यता व ताजेपणा, लेखनातील तत्कालिक संदर्भ, शब्दमर्यादा, लेखनात व्यक्त होणारी लेखकाची व्यक्तिगत भूमिका, लेखात येणारी विषयासंबंधी सर्वांग परिपूर्ण माहिती, लालित्यपूर्ण लेखन आणि स्तंभलेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे लेखनात होणारे प्रकटीकरण अशी काही स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

१८४१ मध्ये 'प्रभाकर' मधील 'शतपत्रे' पासून सुरू झालेल्या स्तंभलेखनाला, लोकसत्ता, केसरी, सकाळ, लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, तरुण भारत या दैनिकांनी एक चेहरा मिळवून दिला. यानंतर अनेक लेखकांनी स्तंभलेखन केलेले आहे. यामध्ये ललित लेखक, परिवर्तनवादी लेखक, क्रीडाविषयक लेखक, विनोदी लेखक, राजकीय-सामाजिक विश्लेषक यांचे स्तंभलेखन गाजले आहे. या स्तंभलेखनातील एकत्रीकरणातून प्रसिद्ध झालेली पुस्तकेही वाचकप्रिय ठरली आहे. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, विजय तेंडुलकर, शांता शेळके या स्तंभलेकखांनी हे स्तंभलेखन ललित किंवा लघुनिबंध अथवा आत्मपर असल्याचे सांगून त्याला वाङ्मयाचा दर्जा दिला आहे.

'गंगाधर पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तित्त्व व स्तंभलेखन'या प्रकरणात गंगाधर पानतावणे यांच्या जडण-घडणीचा, त्यांच्या प्रकाशित वाङ्मयाचा व स्तंभलेखनाचा वेध घेतला आहे. १९६० नंतर गंगाधर पानतावणे यांनी मराठी वाङ्मयात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे.

गंगाधर पानतावणे हे दलित साहित्यिक व दलित साहित्याचे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. समीक्षणात्मक चार पुस्तकातून त्यांनी दलित साहित्याच्या समीक्षणाला वेगळी दृष्टी दिली आहे. तसेच संशोधनात्मक लेखनातून प्रसिद्ध झालेल्या चार पुस्तकातून त्यांनी दलित वाङ्मयात मूलगामी संशोधन केले आहे. मराठी साहित्याची चिकित्सक मांडणी दलित लेखक, विचारवंत यांच्या लेखनाचा शोध आणि मांडणी तसेच साहित्य समाज यांचा अनुबंध साहित्य व संस्कृती यांचा परस्पर संबंध यांच्या नव्या दृष्टीने शोध या पुस्तकातून घेतला आहे. चरित्रे आणि व्यक्तिविशेष अशा स्वरूपाची दोन पुस्तके घेतली आहे. गंगाधर पानतावणे यांनी 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा प्रबंध ग्रंथ त्यांनी लिहिला आहे. एक प्रस्तावना संग्रह प्रकाशित असून, दहा विविध विषयावरील ग्रंथाचे संपादन त्यांनी केले आहे. स्तंभलेखनातून निर्माण झालेली तीन पुस्तके प्रकाशित असून समाज आणि व्यक्ती यांच्या सूक्ष्मनिरीक्षणातून उपरोध उपहास यांच्या माध्यमातून त्यांनी मिश्किल आणि त्याचबरोबर उपहासगर्भ लेखन केलेले आहे. त्यामध्ये लालित्य आणि विचार यांचा सुंदर मिलाफ दिसतो. 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक गंगाधर पानतावणे यांनी ४१ वर्षे एकहाती चालवलेले आहे. त्यांनी 'अस्मितादर्श' च्या माध्यमातून अनेक नव्या लेखक-कवींना हक्काचे माध्यम मिळवून दिले आहे. त्यांनी घडविले आहे. 'अस्मितादर्श' चे अनेक विशेषांक हे संदर्भ मूल्य असणारे असे दर्जेदार अंक असतात. गंगाधर पानतावणे यांनी आपल्या लेखन साम्राज्यावर अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार व सन्मान मिळालेले आहेत.

तिसऱ्या प्रकरणात 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचे स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार व विश्लेषण केले आहे. 'अर्थ आणि अन्वयार्थ' हे स्तंभलेखन दै. लोकसत्ता औरंगाबाद या वृत्तपत्रातून वर्षभर सलग व नियमितपणे प्रसिद्ध होत होते. स्तंभलेखनासाठी आवश्यक शब्दमर्यादेमुळे लेख अधिक रेखीव व बांधेसूद झाले आहेत. सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, वाङ्मयीन, क्रीडा, स्त्रीविषयक या वैशिष्ट्यपूर्ण स्तंभलेखनामुळे स्तंभलेखन वाचनीय व महत्त्वपूर्ण असे झाले आहे. गंगाधर पानतावणे यांनी तत्कालिक घटनेच्या संदर्भात लिहिले आहे. त्या घटनेच्या संदर्भात इतर संदर्भ देत पानतावणे आपली भूमिका मांडतात. गंगाधर पानतावणे स्वत:चे मत मांडताना अट्टाहासाने न मांडता प्रामाणिकपणे मांडल्यामुळे वाचकांना ते भावते. प्रत्येक लेख त्यातील विषयासंबंधी परिपूर्ण माहिती देणारा लेख त्यातील विषयासंबंधी परिपूर्ण माहिती देणारा आहे. त्याला कृत्रिमदर्शनाचा मुलामा न देता आपली भूमिका मांडलेली आहे. राजकीय विषयावरील उपहासात्मक लेख, सामाजिक प्रश्न मांडणारे लेख यातून लेखकाचा व्यापक अभ्यास व समाजहिताची तळमळ दिसते. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, प्रतिगामी धार्मिकता, बालविवाह, कट्टर जातीवाद, स्त्रियांच्या बाबतीत समाजविघातक गोष्टी यावर गंगाधर पानतावणे यांनी हल्ला चढवला आहे. अनेक व्यक्तिचित्रणातून समाजाला दिशा देणाऱ्या तसेच अनेक लेखककवींचे व्यक्तिचित्र इथे साकारलेले आहे. पुरोगामी विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन, बुद्धिवादी मांडणी, आंबेडकर वादावरील निष्ठा, लालित्यपूर्ण व खुसखुशीत भाषाशैली यामुळे हे स्तंभलेखन वाचकप्रिय ठरले आहे.

'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथाचा सामाजिक व वाङ्मयीन दृष्टिकोनातून विचार चौथ्या प्रकरणात करण्यात आला आहे. सामाजिक जीवनातील द्वंद्व आणि माणसांच्या वागण्यातील ढोंगीपणा यांचा वेध गंगाधर पानतावणे यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' या पुस्तकातील लेखांतून घेतला आहे. बालविवाह, जातीप्रथेचे जोखड, नैसर्गिक आपत्ती धर्माची न विसरणारी कट्टर अमानुष धार्मिकता, लोकशाही प्रणाली मधील राजकीय नेत्यांचे मूल्यहीनवर्तन असे अनेक सामाजिक प्रश्न पानतावणे यांनी मांडलेले आहेत. साहित्य संमेलने, नारायण सुर्वे यांना मिळालेला 'जनस्थान' पुरस्कार, रा.ग. जाधव यांचे वाङ्मयीन विषयावरील लेखन य तील लेखात दिसते. राजकीय नेत्यांच्या ढोंगीपणावर विडंबनाच्या माध्यमातून उपहासात्मक पद्धतीने लेखन पानतावणे यांनी केले आहे. हलक्या-फुलक्या विनोदी शैलीने पानतावणे यांनी राजकीय प्रश्नांवरील चिंता, शिक्षणातील भ्रष्टाचार, अनागोंदी कारभार या शिक्षण व्यवस्थेतील प्रश्नावरही प नतावणे यांनी चिंता आणि चिंतन व्यक्त केले आहे.

'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील अनेक महान व्यक्तींची व्यक्तिचित्रणे वाचनीय आहेत. यासाऱ्या व्यक्ती वाङ्मयीन अथवा सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या आहेत. गंगाधर पानतावणे यांच्या लेखातून दलित चळवळ, पुरोगामी चळवळ याविषयी आत्मीयता, आंबेडकर वादावरील अभंग निष्ठा, अप्रत्यक्ष व्यक्त होताना दिसते. अचूक शब्दयोजना, साधी, सोपी, सुटसुटीत भाषा, वाचकांशी संवाद साधणारी निवेदन पद्धती असून त्यात लालित्य आहे. सुसंस्कृत, थेट भाषा, विस्तीर्ण जीवनदृष्टी, अभिनिवेशरहितता आणि लेखनातील लालित्य यामुळे 'अर्थ आणि अन्वयार्थ' मधील लेख वाचकांना प्रभावित करतात.

गंगाधर पानतावणे यांच्या शब्दांच्या ताकदीबद्दल एक सहजता, मांडणीचे गांभीर्य, साक्षेपीपणा, दुर्गुणाबद्दल उपरोधकता, चिकित्सकवृत्ती त्यातून दिसणारी वैचारिकता स्पष्ट करणारे लालित्य यांनी 'अर्थ आणि अन्वयार्थ' हा ग्रंथ परिपूर्ण झाला आहे. स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये यामध्ये पूर्णपणे दिसतात. स्तंभलेखन हा वृत्तपत्रीय लेखनप्रकार आहे. तत्कालिकतेच्या पलिकडे जाऊन अक्षररूप धारण केलेल्या पुस्तकरुपातील वाङ्मयप्रकार म्हणूनही 'स्तंभलेखन' हा लोकप्रिय झालेला लेखन प्रकार आहे.

-----x-----